नं ३३५

म. ग्रं. सं. ठाणें

विषय काव्य

लेखक ब. खं. पारख

सन १८९६

संग्रहालय क्रमांक

पुस्तकाचें नांव

३३५ काव्य

...रा. वळवंत खंडूजी पारख

यांनीं केला.

तो

...० रा० गुलाबदास करसनदास

यांनीं आपल्या

'गोवर्धन मुद्रालयां'त छापून फुकट वाटण्यांसाठीं प्रसिद्ध केला.

शके १८१८-सन १८९६

प्रती ३ हजार.

काव्य
३२०

काव्य
२१४२
२९२



ठाणे

# श्रीशं वंदे.

भारतधर्मसभावृत्त । परिसा देउनियां चित्त ॥ध्रुवपद॥
मुंबापुरि पट्टण हें धन्य । भारतीं न यासम तें अन्य ॥
उदया आलें भारतपुण्य । यास्तव सुमनीं ये सौजन्य ॥
कीं धर्मातें आलें दैन्य । ह्मणुनि होय मति स्वधर्मजन्य ॥
असा, धर्म आपला पुरातन । आजवरी राहिला चिरंतन ॥
आर्यांचा जो जनक सनातन । कोण कुजन या ह्मणेल तात न॥
त्याची ग्लानी जेव्हां होई । ईश तई अवतारहि घेई ॥
सांप्रत त्यातें ग्लानी येई । ती दवडाया परिषद झाली ॥
शक अठराशें अठरा सालीं । मधुमासाची असुनि काहली ॥
मंडळि एथें जमा जाहली । चैत्र वद्यांतिल ही षष्ठी ॥
श्रीकृष्णागाराच्या पृष्ठीं । सुतोषवाया भारतसृष्टी ॥
भृगुदिनिं केली सुसभा स्थापन । हींत बैसलां सर्व आपण ॥
गमे सभा जणु विजयस्यंदन । त्यावरि सारथि देवकिनंदन ॥
त्या श्रीगोस्वामीतें वंदन । करितों आह्मी त्यांचे नंदन ॥

सज्ज करुनिया भक्तिस्यंदन । अधर्मारिवरि करण्या कंदन ॥
रक्षाया धर्माचें बंधन । रथीं आपला आत्मा अर्जुन ॥
सदाचार हनुमानहि गर्जुन । बुभुःकार करि अनीति वर्जुन ॥
वेद चार ह्या अश्वां सज्जुन । चार उपांगें चक्रें लावुन ॥
सदाचार हा शंख वाजवुन । सिद्ध जाहलों शुक्रवार दिनिं ॥
स्वागत मंडलाध्यक्ष होउनि । श्री जीवनजी राज समर्थ ॥
प्रेमें वदती तो परमार्थ । ज्यांनीं सभेस दिधला अर्थ ॥
शत मुद्रांचा प्रेमेंकरुनी । ह्मणुनि सभा आठवी उपकृती ॥
धन्य धन्य हे स्वामी सुकृती । मग ते दिवाण वदती मिष्ट ॥
मणिभाई सन्नामें श्रेष्ठ । धर्मबीज जें बहु उत्कृष्ट ॥
शरीर जमिनींमधीं रुजविलें । त्यांनीं येथें भाषण केलें ॥
पवित्र गीतेसम सद्वचनीं । गोस्वामी श्रीकृष्णमुखानें ॥
ऐकुनि झालों तुष्ट सुखानें । त्यांतिल लक्षांशाचा अंश ॥
करितों श्रुत सुष्ट जनास । कीं मज आपण मुख्य योजिलें ॥
याजमुळें मजवरी आपले । आभाराचें झालें ओझें ॥
आतां परिसा भाषण माझें । धर्म आपल्या कामीं येई ॥
धर्म आपली भागिनी आई । धर्म पिता हा धर्मचि आई ॥
स्त्रीपुत्रादिक कोणी नाहीं । यास्तव शरीर स्वस्थ जोंवर ॥

जरा राहिली जोंवरि दूर । अंगीं शक्ती करि फुरफूर ॥
न होय जीवित चकनाचूर । तोंवरि तरणोपाय करावा ॥
स्वधर्म आपण मनीं धरावा । नाहिं तरी मग व्यर्थचि कष्ट ॥
दृष्टांताची ऐका गोष्ट । अग्नि लागला गेहा खूप ॥
खणायास मग धावें कूप । व्यर्थ होय मग त्याचा हूप ॥
मनुष्य ह्मणतें हें घर माझें । वस्त्रपात्र धनकांचन माझें ॥
यापरि 'मे मे' वदनें करुनी । मानव हा अजरूप होऊनी॥
वृकरूपी तो काळ येऊनी । जाई त्याचा प्राण घेउनी ॥
नाना स्थलचें नानाविध जल । एक त्यापरी सुभक्ति सोज्वल॥
भक्तिस्तव जरि जनलोकांनीं । केली निंदा ऐका कानीं ॥
दुर्जन मातेहुन उपकारी । समजावा तो परोपकारी ॥
धर्म आपला फार श्रेष्ठ । दशविध त्याचे प्रकार इष्ट ॥
क्षमा दया शम इंद्रियनिग्रह । कामीं क्रोधीं लोभीं विग्रह ॥
विद्या, सत्या वरितो आग्रह। आस्तिक मति सत्याचा तो ग्रह॥
बुद्धि मनातें स्वाधिन केलें । जहदजहल्लक्षणा जाणिलें ॥
जन्ममरण हें दूर झोंकिलें । तईंच नरतनुसार्थक झालें ॥
मतें शैववैष्णवादि नाना । करोत जागीं व्यर्थ भांडणा ॥
परि सर्वांचा ईश्वर एक । असोत देशीं पंथ अनेक ॥

सज्जन करिती मनीं विवेक । श्री अध्यक्ष यापरि वदले ॥
राव बहादुर मग ते आले । उपनामाचे असती पितळे ॥
विषयनियामक मंडळि नेमिली । नामें त्यांचीं वाचुन दाविली ॥
भृगुदिनें यापरि वार्ता झाली । संक्षेपानें सुजनां कथिली ॥
नंतर मंदादिनीं ही मंडळी । जमली त्यांची सर्व आवली ॥
मग तो आला विषयाचे पहिला । कीं धर्माचा बंध सूटला ॥
नीतीचा संबंध खूटला । दुसरा यातें उपाय केला ॥
त्वरित पाहिजे ह्मणून आणिला । दिवाण बहादुर मणिभाई ॥
ज्यांनीं केली खरी नवाई । परमार्थी सद्बुद्धि सवाई ॥
स्वतां पाहिली नसे अवाई । नंतर येती ते नारायण ॥
शास्त्री ज्यांचें बहु पारायण । त्यांनी दिधलें त्या अनुमोदन ॥
येती घमंडे नंतर बोवा । लाभ तयांनीं जनास द्यावा ॥
भाषणयोगें संतुष्ट जनास । गोड वाटले कानमनांस ॥
ह्मणुनि पात्र हे त्या नमनास । नंतर येती मंगळदास ॥
त्यानंतर ते खासगिवाले । महाजनहि त्या मागुनि आले ॥
तोषविलें मग माणिकलाले । प्रथम होति ते पाय बांधले ॥
स्वतां मोकळे नंतर केले । भाषण तें कळकाळिचें झालें ॥
पारितोषकाहि सभेस दिधलें । पंचविंशति मुद्रा अर्पण ॥

काव्य
३३६५

करूनि केला विषय विपूर्ण । नंतर येई दुसरा तूर्ण ॥
विश्वनाथ प्रभुराम यावरी । बोलुनि येती देव त्यावरी ॥
नाम तयासी तें गोविंद । तोषविला हा त्यांनीं वृंद ॥
वकीलिचा तो विसरुनि फंद । परमार्थाचा लागे छंद ॥
केली पूर्वीं फार वकीली । तदुपरि गृहधनदारा केली ॥
परमार्थी सद्‌बुद्धि भुकेली । देव उपास्या सत्याचि केली ॥
शंकरशास्त्री सोमण आले । त्यांनीं भाषण एथें केलें ॥
संस्कृतामधीं स्वतां बोलले । पुण्यपत्तनस्थहि उमराव ॥
येति भाषणा धरूनि हाव । मग ते लिमये आत्माराम ॥
भाषण ज्यांचें दे आराम । शनीवारचें संपे काम ॥
दोन दिवस हे जाति ललाम । रविदिनिं सभेंत विषय येति ते॥
कथितों सर्वा सुजन संमते । आर्यवैद्यका द्यावा असरा ॥
येइ पुढें तो विषयचि तिसरा । मद्यप्राशन निंद्य सर्वथा ॥
येत विषय ह्या सभेंत चवथा । गोरक्षण हा विषय पांचवा ॥
सभेस वदतो मनीं सांचवा । सभोद्देश हा विषय सहावा ॥
तिसरा सभेंत आणिति ज्यास । प्रभुरामजी सुनाम त्यास
त्यांनीं त्यांतें सुगौरवीलें । शंकर दाजी शास्त्री आले ॥
त्यांनीं ह्यावरि भाषण केलें । मणिशंकरजी नंतर आले ॥

वासुदेव आचार्य बोलले । पोपट प्रभु रामाची सुकृति ॥
वैद्यकलामय झाली यन्मति । दिनकर शास्त्री दूर्वांलती ॥
ओक धुळ्याचे मग ते वदती । मद्यप्राशन फार हानिकर ॥
आणिति नाना ते कानिटकर । वदति मद्यप्या कान नीट कर॥
पारख देई त्यांना निजकर । लक्ष्मणदासहि वदले त्यावर ॥
इंग्लिश विद्येमधले पंडित । थोर पदाचे गुणगणमंडित ॥
महादेवसुत ते शिवराम । वचन जयाचें दे आराम ॥
त्यांनीं केलें उत्तम भाषण । निंद्य असें हें मद्यप्राशन ॥
हें होउनि हा विषयचि पूर्ण । नंतर येई तें गौरक्षण ॥
जें अस्मच्छक्तीचें पोषण । अशा सुगोमातेची भक्ती ॥
रक्षुनि वाढाया निजशक्ती । विषय सभेला सुजन दाविती ॥
गणपत दलसाराम बोलती । बाळकृष्ण त्या संमत देती ॥
पंडित जगनारायण वदती । येती मग शिवराम साधले ॥
वक्तृत्वहि ज्या पूर्ण साधलें । प्रसंगि नच कोणास बांधलें ॥
झाली विषयाची निवृत्ती । पंचविषय हे एथें संपति ॥
नेत्रिं पहावा विषय सहावा । ज्याचा आमुच्या मनांत धांवा ॥
सभोद्देश हे जनास कळवा । मनोवृत्तिही त्यांची वळवा ॥
विकल्प त्यांच्या मनचा पळवा । पुढें आणिती पितळे खास॥

रावबहादुर पदवी त्यांस । टेका देतां पागे ज्यास ॥
नंतर ते मनमोहनदास । विषय यापरी सर्व संपले ॥
सन्मानार्थीं बहुत बोलले । गायन, वादन बालकिं केलें ॥
अनेक परिनें सुगौरवीलें । उत्साहें बहू कार्य साधलें ॥
जें सभ्यांनीं सुमान्य केलें । काल श्रमाला मुळीं न गणिलें ॥
श्रीमद्देवकिनंदन राज । त्यांशीं उत्कंठेनें आज ॥
बोळवुनी बहू केलें काज । सर्वांनीं उत्सवा सजाविलें ॥
तनुमनधन हें अर्पण केलें । योग्य जनांनां मान्य झाहलें ॥
आभारी जन ज्यांचे झाले । त्यांचीं नामें परिसा आतां ॥
देउनि आपण एथें चित्ता । धर्मरीतिचा दाविति कित्ता ॥
श्रीमद्देवकिनंदनचरणीं । साष्टांग प्रणिपात करूनी ॥
महाराज श्री जीवनजी । पंडितवर कवि गट्टुलालजी ॥
भारतमार्तंड पदवी ज्यांसी ॥ महामहोपाध्याय सुवर्य ॥
झळकीकर ते भीमाचार्य । त्यापरि बोडस हे गुरुवर्य ॥
रावबहादूर मणीभाईचे । गाडागिळांचे आभाराचें ॥
ओझें झालें बहुत दिसांचें । पुनरुज्जीवन बहु दिवसांचें ॥
माना उपकारा पितळ्यांचें । येउनि मनांत आह्मां नेत्री ॥
पदें दाविती शंकर शास्त्री । तसे सोहनी दुसरे मंत्री ॥

ठाणें.

वास जयांचा माहुलि क्षेत्रीं । पहा घमंडे स्वकीय नेत्रीं ॥
कीर्ति जयांची वार्तापत्रीं । फुलकर वेलणकर या मित्रीं ॥
केले श्रम त्या पुण्यक्षेत्रीं । गणपतराव भिवाजी नाइक ॥
ज्यासी वदती जी. बी. नाइक । पुण्य नगरचे असति स्थाइक॥
त्यांनीं करुनि श्रम ते कायिक । पंखे सभेस बहु पुरविले ॥
अध्यक्षांना घड्याळ दिधलें । यास्तव त्यांची होय उपकृति ॥
असून ज्यांतें बहु श्रीमंती । त्रिभुवनदासांची ही मूर्ती ॥
ह्या कामीं ते कर फुरफुरती । परिषदकार्यीं श्रम बहु करिति ॥
प्रतिनिधि लोकां स्वयें निमंत्रिति । ठेवा अक्षय अशीच प्रीती॥
असो सभेची वाढो ख्याती । सभेस जे मुद्रिका अर्पिती ॥
त्यांची तशीच होय उपकृति । असो सभा ही हो यशवंत ॥
दिवसेंदिवस ही बळवंत । खंडूजी सुत हा बळवंत ॥
यापरि परिषद्वर्णन करित । ईश्वरचरणीं मस्तक धरित ॥
विद्वानांच्या चरणां चूरित । कटिबंधातें या संपवित ॥
परिसा देउनियां चित्त । भारतधर्मसभावृत्त ॥ १ ॥

# सूचना.

सनातन भारतधर्म परिषदेच्या पहिल्या वर्षाच्या हकीकतीचें पुस्तक (रिपोर्ट) तयार होत आहे तें लौकरच छापून सर्वांस मिळेल, त्याची काय किंमत ठेवण्यांत येईल वगैरे खुलासा नंतर प्रसिद्ध करण्यांत येईल.

२. महापरिषदेंत पसंत झालेल्या ठरावाचे बाबतींत ज्या कोणास कांहीं माहिती पाठविणें असेल, मदत करणें असेल किंवा सूचना करणें असतील, त्यांनीं खालील ठिकाणीं पत्रव्यवहार करावा.

३. महापरिषदेच्या पुस्तकालयास धर्मसंबंधीं वगैरे ग्रंथ किंवा पुस्तकें वगैरे पाठविणारांनींही तूर्त तीं खालील ठिकाणींच पाठवावीं.

**शंकर दाजी शास्त्री पदे.**
**नारायण रामचंद्र सोहनी.**
**विश्वनाथ प्रभुराम वैद्य,** बी. ए.
प्र. का. मंत्री.

**मंगळदास जमनादास,**
सहकारी मंत्री.

**ठिकाणा**—मुंबई, नवा नागपाडा, आर्यभिषक् कचेरी.